महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी
उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि.रायगड
पत्ता:- वाल्मिकी नगर, नित्यानंद मार्ग ,पनवेल (प) पिन कोड - ४१०२०६
E-mail :- rhpanvel@gmail.com Ph no :- 022- 27453398

जा.क्र.उ.जि.रू. पनवेल/अत्यावश्यक लॅब रिएजेंट दर निश्चिती दरपत्रके जाहीर नोटिस /औ. भां. / 2255 /२०२६

दिनांक : 07/08/26

# जाहीर नोटिस

सूचित करण्यात येते की , वैद्यकीय अधीक्षक , महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड कार्यालयामार्फत सोबत दिलेल्या लॅब रिएजेंट खरेदी करण्यासाठी फक्त दर निश्चित करण्यासाठी तात्काळ दरपत्रके मागविण्याचे निश्चित केले आहे . त्याकरिता सोबत दिलेल्या यादीतील लॅब रिएजेंटचे इच्छुकांनी अवलोकन करावे. **सदरची खरेदी ही केवळ स्थानिकरित्या खरेदी असून त्यानुसारच खरेदीचे दर हे सर्व करारासहित नमूद करावेत. खरेदीचे दर निश्चितीनंतर रुग्णालयाच्या गरजेनुसार त्या त्या वेळेस स्वतंत्र्य पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येतील ,अथवा मौखिक आदेशाद्वारे सुद्धा लॅब रिएजेंट तात्काळ मागणी करताच पुरवठा करणे बंधनकारक राहील या सर्व बाबी विचारात घेऊन व खालील अटी व शर्तींचे पालन करून सर्व कर नमूद करूनच दरपत्रके सादर करण्यात यावीत .**

| Sr. No | Name of Medicine | Rate of each item |
|---|---|---|
| 1 | HCV KIT | 1 Nos. |
| 2 | VDRL KIT | 1 Nos. |
| 3 | WIDAL KIT | 1 Nos. |
| 4 | HBsAG KIT | 1 Nos. |
| 5 | DENGUE KIT | 1 Nos. |
| 6 | UPT KIT | 1 Nos. |
| 7 | SUGAR SOLUTION | 1 Nos. |
| 8 | FIELD STAIN A & B | 1 Nos. |
| 9 | CARDIAC MARKER KIT | 1 Nos. |
| 10 | LEPTO KIT | 1 Nos. |
| 11 | GLASS SLIDE | 1 Nos. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 12 | FULLY AUTO EM 200 BIOCHEMISTRY REAGENT<br>(UREA, CREATININE, T-BILURUBIN, D-BILURUBIN, SUGAR, PROTEIN, SGOT, SGPT, TRIGLYCERIDE, ALKALINE PHOSPHATE, CHOLESTEROL, PHOSPHOURS, ALBUMIN, CALCIUM, URIC ACID, AUTO WASH REAGENT, NORM PATH REAGENT, GLUCOSE etc) | 1 Nos. |
| 13 | CELL COUNTER REGAENT (ERBA H360) LYSE, | 1 Nos. |
| 14 | CELL COUNTER REGAENT (ERBA H360) DILUENT | 1 Nos. |
| 15 | CELL COUNTER REGAENT (ERBA H360) CLEANER | 1 Nos. |
| 16 | N/10 HCL | 1 Nos. |
| 17 | URISTICK (ALBUMIN + KETONE) | 1 Nos. |
| 18 | URISTICK (ALBUMIN + GLUCOSE) | 1 Nos. |
| 19 | URISTICK 10 PARAMETER | 1 Nos. |
| 20 | ANTI A MONOCLONAL ANTIBODY / ANTI A ANTISERA | 1 Nos. |
| 21 | ANTI H LECTIN | 1 Nos. |
| 22 | COVERSLIP | 1 Nos. |
| 23 | TROP L / TROP T KIT | 1 Nos. |

१) इच्छुकांनी वरील लागणारी लॅब रिएजेंट यांचे स्वतंत्र दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात वैद्यकीय अधीक्षक महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड या नावाने सादर करावीत . प्रत्येक फर्मला फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी आहे. लिफाफ्यावर ज्या बाबींसाठी दरपत्रके सादर करत आहेत त्या बाबींचा स्पष्ट उल्लेख नमूद करावा.

२) सदरची खरेदी ही स्थानिक रित्या खरेदी आहे त्यानुसार खरेदीचे दर नमूद करताना मागणी करण्यात आलेल्या शेऱ्यामधील नुसारच व सर्व करासहित असावेत . सदरचे दर हे केवळ दर निश्चिती असून रुग्णालयाच्या गरजेनुसार खरेदी करण्यात येईल. सदरचे दर हे मंजूर दर आदेशापासून १८० दिवसांकरीता वैध राहतील .

३) दरपत्रका सोबत अन्न व औषध प्रशासनाकडील वैध नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४) जी. एस. टी. नंबर व प्रमाणपत्र पूर्वानुभव दाखला

५) संस्था/दुकान , उपकरणे, उत्पादन / विक्रीविषयक नोंदणी दाखला

Scanned with CamScanner

६) दरपत्रके पोहोच करण्याचे ठिकाण : - वैद्यकीय अधीक्षक , महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड कार्यालयीन वेळेत (सुट्टी वगळता सायंकाळी ५.०० वा पर्यंत)

७) यादीमधील बाबी आवश्यकते प्रमाणे खरेदी केल्या जातील .

८) ठरवून दिलेल्या कालावधीत लॅब रिएजेंटचा पुरवठा न केल्यास नियमानुसार रक्कम पुरवठादारकाच्या देयकातून वसूली केली जाईल . दरपत्रक मंजूर झाल्यावर पुरवठा केलेल्या मालाच्या बिलामध्ये आपली संस्था/दुकान ,उपकरणे, उत्पादन / विक्रीविषयक नोंदणी क्रमांक , पॅनकार्ड ,जीएसटी नंबर लिहावा . तसेच आयकर, व्यवसाय कर नियमानुसार जे शासकीय कर लागू असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रकाधारकाची राहील. मंजूर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा करणे शक्य झाले नाही व त्यामुळे वाढीव दराने खरेदी करावी लागली तर निविदेतील मंजूरदर व वाढीव दर यामधील फरकाची रक्कम आपल्याकडून वसूल करण्यात येईल. सदर दरपत्रकातील बाबींचा पुरवठा हा हॉस्पिटलपर्यंत आणून पोच करावा त्यासाठी वेगळे भाडेशुल्क दिले जाणार नाही .

९) सोबत जोडलेल्या यादीतील आपण पुरवठा करणाऱ्या लॅब रिएजेंट साहित्यांचा दर देणे बंधनकारक आहे .

१०) यंत्रसामग्री ही मानांकनाप्रमाणे व तपशीला प्रमाणेच असावी तसेच यंत्र सामुग्रीची वारंटी हि कमीत कमी १(एका ) वर्षाची असावी .

११) आपल्या संस्थेचे या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी /कर्मचारी यांच्याबरोबर हितसंबंध नाहीत याबाबत प्रमाणपत्र दरकरारा सोबत जोडावे. लॅब रिएजेंट हे मानांकित कंपन्यांची असावीत व दरपत्रक भरतेवेळी उत्पादित कंपनीचे नाव लिहणे आवश्यक आहे. लॅब रिएजेंट खरेदी वेळी आवश्यक ते मात्रा गरजेनुसार खरेदी करण्यात येईल सर्व बाबी यादीनुसार खरेदी करणे कार्यालयावर बंधनकारक नाही. एखादे लॅब रिएजेंट अप्रमाणित आढळल्यास त्या विषयी होणाऱ्या सर्व शासकीय कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रधारकाची राहील. नवीन बदली करून द्यावे लागल्यास तो पुरवठा बिना शर्त व इतर खर्चाशिवाय पुरवणे हे दरपत्रधारकास बंधनकारक आहे. यादीमध्ये नमूद केलेली लॅब रिएजेंट मागणीनुसार त्वरीत पुरवठा करण्यात यावीत . १ वर्षापेक्षा कमी प्रभावशून्यतेची लॅब रिएजेंटचा पुरवठा करण्यात येऊ नये. निश्चित केलेल्या दराप्रमानेच देयके तीन प्रतित सादर करावीत .

१२) पुरवठा केलेल्या लॅब रिएजेंटची देयके अनुदानाच्या उपलबद्धतेनुसार अदा केली जातील .

१३) लॅब रिएजेंट हे अत्यावश्यक सेवेसाठी लागणार असून रुग्णालयान मागणी करताच तात्काळ पुरवठा करणे पुरवठा धारकास बंधनकारक आहे.

१४) दरपत्रके स्विकारण्याची मुदत जाहीर नोटिस प्रसिद्धी दिनांक 07/08/26 पासून सुट्टीचे दिवस वगळून 17/08/26 रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा

Scanned with CamScanner

विचार केला जाणार नाही. दरपत्रके उघडण्याची तारीख दि. 18/08/26 रोजी किंवा कार्यालयीन कामकाजानुसार त्यापुढील राहील.

१५) कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा क्रिया स्थगित ठेवण्याचा किंवा लॅब रिएजेंटची खरेदी संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार मा. वैद्यकीय अधीक्षक, महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी रुग्णालय पनवेल जि. रायगड यांनी राखून ठेवलेला आहे. यासाठी कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण दिले जाणार नाही .

डॉ. शिवाजी एस. पाटील

वैद्यकीय अधीक्षक वर्ग - १

महाराष्ट्र भूषण'नानासाहेब धर्माधिकारी

उपजिल्हा रुग्णालय पनवेल जि. रायगड.

**Medical Superintendent Cl-1**

**Sub District Hospital, Panvel**

उप जिल्हा रुग्णालय पनवेल * SUB. DISTRICT HOSPITAL, PANVEL *

Scanned with CamScanner